ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# ग्रामसभेतील लोकांचा सहभाग हाच खऱ्या अर्थाने गावाच्या विकासाचा मार्ग

**सुभाष अमर सावंत, Ph. D.**

*लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मंडणगड, मु. पो. ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी 415203*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

आपला देश हा खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. 5 लाख 70 हजाराहून अधिक खेडी मिळून आपला हा देश बनला आहे. या खेडयांचा जेव्हा विकास होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने संपूर्ण देशाचा विकास होईल असे आपणास म्हणता येईल. यासाठीच प्रत्येक खेडयाला किंवा गावाला हया ग्रामसभेच्या कायद्याच्या माध्यमातून स्वातंत्र दिले आहे. तुम्हाला तुमच्या गावचा विकास कसा करावयाचा हे तुम्ही ग्रामस्थ मिळून ठरवा. त्यामुळे सर्व ग्रामस्थांनी मिळून गावाच्या कारभाराचा निर्णय घ्यावयाचा आहे. ग्रामसभेने म्हणजेच गावातील सर्व ग्रामस्थांनी घेतलेला निर्णयाचो अंमलबजावणी ग्रामपंचायतीने म्हणजेच सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी करावयाची आहे. कारण ग्रामसभा ही सर्वोच्च संस्था असून ग्रामपंचायत ही तिची कार्यकारी संस्था आहे.

देशाचा कारभार पाहण्यासाठी लोकसभेच्या माध्यमातून लोकांचे प्रतिनिधी म्हणून खासदारांना लोकसभत पाठविण्यात आले. तर राज्याचा कारभार पाहण्यासाठी प्रत्येक राज्यातून आमदारांना विधानसभेत पाठविण्यात आले. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार पाहण्यासाठी लोकांचे प्रतिनिधी म्हणून गावपातळीवर ग्रामपंचायत सदस्य, तालुकापातळीवर पंचायत समिती सदस्य व जिल्हापातळीवरील कारभार पहाण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर पाठविण्यात आले आहेत.

असे असले तरी या सर्व संस्थापेक्षा ग्रामसभेला सर्वाधिकार दिले आहेत. थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्या अथक प्रयत्नातून ग्रामसभेला सर्वोच्च स्थान मिळाले आहे. देशात लोकसभा, राज्यात विधान सभा आणि गावात ग्रामसभा ही अण्णा हजारे यांनी हाक दिली यातूनच खऱ्या अर्थाने ग्रामसभेला सर्वोच्च स्थान मिळाले. कारण लोकसभेमध्ये आपण आपले प्रतिनिधी म्हणून खासदार पाठवितो. राज्यात आपण लोकांचे प्रतिनिधी म्हणून आमदारांना पाठवितो. मात्र प्रत्यक्षात गावाच्या ग्रामसभेला गावातील प्रत्येक मतदाराला उपस्थित राहण्याचा व प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊन निर्णय घेण्याचा अधिकार दिला. देशाच्या कोणत्याही व्यवस्थेत किंवा निर्णय प्रक्रियेत प्रत्यक्ष लोकांचा सहभाग नाही. मात्र ग्रामसभेला प्रत्यक्ष लोकांचा सहभाग कायद्याने दिला आहे.

देशाच्या किंवा राज्याच्या कारभाराचा विचार करता आपण पाठविलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून चालविलेल्या कारभारावर आपणच नाराज असतो. बऱ्याच वेळा आपण पाठविलेले प्रतिनिधी बरेचसे निर्णय चुकीचे घेतात तसेच बऱ्याच वेळा ते चुकीचेही वागतात. परंतु अशा वेळी त्यामध्ये आपण तेव्हा कोणतीही सुधारणा करू शकत नाही किंबहुना आपण हताश होतो. आपल्या म्हणण्यानुसार देशाचा कारभार चालत नाही असे आपण वारंवार बोलतो. या सर्व परिस्थितीचा विचार करता ही परिस्थिती आपणास गावाच्या विकासासाठी तरी बदलता येईल याचा विचार करूनच ग्रामसभेला सर्वोच्च अधिकार दिले गेले आहेत. गावातील प्रत्येक विकासकार्य सर्व ग्रामस्थांच्या मर्जिने झाले पाहिजे. गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून आपल्या विकासाच्या कल्पना व गावातील उपलब्धता याचा पर्याप्त मेळ घालणे गरजेचे आहे. विकास प्रक्रियेमध्ये तळागाळातील घटक सहभागी झाले पाहिजेत. गावातील विकास प्रक्रियेमध्ये कोणत्याही व्यक्तीची किंवा घटकाची मक्तेदारी असता कामा नये. विशिष्ट राजकीय पक्ष, विशिष्ट जाती, धनवान, जमीनदार, सावकार इत्यादींच्या दबावाने गावातील विकासाचा कोणताही निर्णय होऊ नये यासाठीच ग्रामसभेला सर्वाधिकार दिले गेले आहेत.

देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत किंबहुना स्वातंत्र्याच्या नंतर काही कालखंड प्रत्येक गावाची सत्ता ही जीनदार, सावकार, धनदांडगे, गावातील उच्च जाती इत्यादींच्या मूठभर लोकांच्या हातात होती. त्यामुळे गावचा विकास करायचा की नाही? करायचा तर तो कसा करायचा. कोणत्या घटकाला कोणत्या सोई सुविधा द्यायच्या याचा सर्व निर्णय हयाच मूठभर व्यक्ती घेत होत्या. त्यामुळे तळागाळातील पिचलेला समाज अधिक गरीब होत होता. तर श्रीमंत वर्ग अधिक श्रीमंत होत होता. लोकशाही व्यवस्थेमध्ये राहूनही बहुताश गावाचे कारभार हे हया सत्ताधारी मूठभर लोकांच्या सल्ल्याने चालत असत. त्याचा परिणाम म्हणजे जो गरीब पिचलेला वर्ग त्यांची प्रगती खुंटली तसेच त्यांच्या परिसरातही कोणत्याही सोई सुविधा होऊ दिलेल्या नाहीत. पायवाटा, रस्त्ये, विहीरी, शाळा इ. प्राथमिक सुविधा सुध्दा अनेक वाडयावस्त्यांवर पोहचत नव्हत्या. त्यामुळे ही खेडी खऱ्या अर्थाने देशाला स्वातंत्र्य मिळूनही खऱ्या अर्थाने पारतंत्र्यात होती. त्यांचा विकास म्हणावा तसा झाला नाही.

म्हणूनच जर प्रत्येक गावाची सूत्रे ग्रामस्थांकडे दिली तर आपल्या गावचा विकास कसा करावयाचा याचा विचार सर्व ग्रामस्थ मिळून करतील. यामध्ये गावातील तळागाळातील सर्वच घटक सहभागी असतील. त्यामुळे त्यांच्या विकासाचा किंवा त्यांच्या वाडया—वस्त्यांच्या विकासाचे प्रश्न ते ग्रामसभेत सोडवतील. यासाठी ग्रामसभेला खऱ्या अर्थाने सर्वाधिकार दिले गेले आहेत. परंतु हे अधिकार देऊन आज काही काळ लोटला आहे. सद्य स्थितीत या अधिकारामुळे नक्की काय बदल झालेला आहेत का? तसेच मंडणगड तालुक्यातील ग्रामसभांबाबत नक्की काय परिस्थिती आहे याचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने हया संशोधनाची मांडणी केलेली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये –**

1) ग्रामसभा कायदा किंवा ग्रामसभेबाबत ग्रामस्थांना माहिति आहे का? याचा अभ्यास करणे.

2) ग्रामसभेतील आपले अधिकार व कर्तव्य ग्रामस्थांना माहित आहेत काय? याख अभ्यास करणे.

3) ग्रामसभेतील लोकांचा सहभाग कसा असतो? याचा अभ्यास करणे.

4) ग्रामसभा यशस्वितेने काम करत आहेत का? जर नसतोल तर त्याची कारणे कोणती? ग्रामसभा यशस्वी करण्यासाठी काय सूचना करता योतील याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतत्वे –**

1) ग्रामसभा कायदा किंवा ग्रामसभेबाबत बऱ्याच ग्रामस्थांमध्ये अजूनही जागृतता दिसून येत नाही.

2) ग्रामसभेतील आपले अधिकार व कर्तव्य याबाबत सुध्दा ग्रामस्थांमध्ये तेवढया प्रमाणात जागृतता दिसून येत नाही.

3) ग्रामसभेतील लोकांचा नियमित सहभाग फारच कमी आहे.

4) गावाच्या विकासाचा मार्ग ग्रामसभेतून जातो. याचीही पुरेशी माहिती ग्रामस्थांना दिसून येत नाही.

5) गावातील महिलांचा सुध्दा ग्रामसभेतील सहभाग अतिशय कमी दिसून येतो.

6) ग्रामसभेतील सदस्य मोठया प्रमाणात गावाबाहेर नोकरीनिमित्ताने स्थलांतरीत झालेले आहेत. त्यामुळे ग्रामसभा यशस्वितेमध्ये मोठया प्रमाणात अडथळे दिसून येतात.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –**

सदर संशोधनाचा विचार करता हा प्रश्न भारतातील सर्वच खेडयांशी संबधित आहे. भारतातील अंदाजे 5 लाख 70 हजार खेडयांचा विकास व्हावयाचा असेल तर त्या खेडयांची सत्ता ग्रामस्थांच्या हातात देणे गरजेचे आहे. या साठीच ग्रामसभेच्या माध्यमातून प्रत्येक ग्रामस्थांना आपल्या गावाच्या विकासाची संधी दिली गेलेली आहे. परंतु या संधीचा फायदा घेऊन ही खेडी खरोखरच विकसित होत आहेत का, याचा अभ्यास करण्यासाठी ग्रामसभेच्या यशस्वितेचा अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणून या संशोधनांची व्याप्ती ही राष्ट्रीय पातळीवरील दिसून येते.

असे असले तरी भारतातील 5 लाख 70 हजार खेडयांचा अभ्यास संशोधकाला करणे अशक्य आहे. यासाठीच मर्यादित स्वरूपात अभ्यास करून त्या संदर्भातील येणारे निष्कर्ष आपण थोडयाफार प्रमाणात का असेनात संपूर्ण देशासाठी लागू पडू शकतात. यासाठी वेळच्या मर्यादेचा विचार करता मंडणगड तालुका हे कार्यक्षेत्र संशोधकाने निवडले असून त्यातील पाच ग्रामसभांमधील 100 सदस्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**मंडणगड तालुक्यातील ग्रामसभांचा संशोधनात्मक अभ्यास**

मंडणगड तालुक्यातील पाच ग्रामसभांच्या सदस्यांचा अभ्यास संशोधकाने केलेला आहे त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**ग्रामसभेची माहिती –**

**कोष्टक कमांक 1 ग्रामसभा कायदा माहिती बाबत**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | – | – |
| 2) | नाही | 100 | 100 |

वरील कोष्टकाचा विचार करता ग्रामसभा कायद्याबद्दल माहिती नसणारे 100 टक्के लोक दिसून येतात.

**ग्रामसभेच्या कार्याबद्दल माहिती –**

ग्रामसभेचे कार्य कसे चालते, याच्याबद्दल हया लोकांना कोणी कधी थोडीफार तरी माहिती दिली आहे काय या बद्दलची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**कोष्टक कमांक 2 ग्रामसभेच्या कार्याबद्दल माहिती देणारे घटक**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | ग्राम पंचायत सदस्य | – | – |
| 2) | राजकीय नेतृत्व | – | – |
| 3) | गावातील इतर नेतृत्व | – | – |
| 4) | ग्रामसेवक | 25 | 25 |
| 5) | कोणीही नाही | 75 | 75 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकाचा विचार करता ग्रामसभेची माहिती लोकांना देणाऱ्या विविध घटकांचा विचार करता ग्रामपंचायत सदस्य, राजकीय नेतृत्व, गावातील इतर नेतृत्व यांच्यापैकी कोणीही गावातील लोकांना ग्रामसभेसंदर्भात माहिती देतांना दिसून येत नाही. मात्र ग्रामसेवक यांच्या माध्यमातून 25 टक्के लोकांना ग्रामसभेची थोडीफार माहिती मिळालेली दिसून येते. उर्वरीत 75 टक्के लोकांना ग्रामसभेसंदर्भात कोणही माहिती देताना दिसून येत नाही.

**ग्रामसभेतील आपल्या अधिकाराबाबत माहिती –**

ग्रामस्थांना आपले ग्रामसभेतील अधिकार काय आहेत याची माहिती किती लोकांना आहे याची माहिती पुढीलप्रमाणे...

**कोष्टक कमांक 3 ग्रामसभेतील आपले अधिकार याबाबत माहिती**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | – | – |
| 2) | नाही | 87 | 87 |
| 3) | सांगता येत नाहीत | 13 | 13 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकानुसार ग्रामसभेचे अधिकार माहित असलेले ग्रामस्थ दिसून येत नाहीत. ग्रामसभेचे अधिकार आम्हाला माहित नाहीत असे म्हणणारे 87 ग्रामस्थ म्हणजेच 87 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. मात्र 13 टक्के लोकांना आपल्याला ग्रामसभेचे अधिकार माहित आहेत की नाही हे सांगता येत नाही.

**गावाचा विकास कोणी व कसा करावयाचा –**

गावाचा विकास खऱ्या अर्थाने आज ग्रामस्थांच्या हातात आहे याची जाणीव ग्रामस्थांना आहे काय याची माहिति पुढीलप्रमाणे

**कोष्टक कमांक 4 गावाच्या विकासाबाबत माहिती**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | नेते मंडळी | 67 | 67 |
| 2) | ग्रामस्थ | 17 | 17 |
| 3) | सरकार | 16 | 16 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकानुसार गावचा विकास नेते मंडळी करतील असे म्हणणारे 67 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. ग्रामस्थ गावचा विकास करू शकतात असे म्हणणारे ग्रामस्थ 17 टक्के इतके दिसून येतात. तर गावचा विकास सरकार करेल असे म्हणणारे 16 टक्के ग्रामस्थ दिसून येतात.

**ग्रामस्थांचा ग्रामसभसेतील सहभाग –**

गावाच्या विकासाची सुत्रे ग्रामस्थांच्या हातात दिल्यामुळे साहजिकच ग्रामस्थांचा गावाच्या विकासातील सहभाग वाढणे अभिप्रेत आहे. अशा हया ग्रामसभेस ग्रामस्थ उपस्थित असतात का? याची माहिती पुढील प्रमाणे...

**कोष्टक कमांक 5 ग्रामस्थांचा ग्रामसभेतील सहभाग**

| अ.क. | घटक | संख्या पुरूष | स्त्रिया | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1) | नियमित ग्रामसभेस उपस्थित राहणारे | 20 | 07 | 27 | 27 |
| 2) | कधीतरी ग्रामसभेस उपस्थित राहणारे | 15 | 25 | 40 | 40 |
| 3) | ग्रामसभेस न जाणारे | 15 | 18 | 33 | 33 |
| | एकूण | 50 | 50 | 100 | 100 |

वरील कोष्टकचा विचार करता नियमितपणे ग्रामसभेला उपस्थित राहणाऱ्या ग्रामस्थांची संख्या 27 इतकी म्हणजेच 27 टक्के इतकी दिसून येते. त्यामध्ये 20 पुरूष म्हणजेच 20 टक्के पुरूष दिसून येतात. तर स्त्रिया 07 म्हणजेच 07 टक्के दिसून येतात. कधीतरी ग्रामसभेला उपस्थित असणारे 40 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. त्यामध्ये 15 टक्के पुरूष तर 18 टक्के स्त्रिया दिसून येतात. तर ग्रामसभेला उपस्थित नसलेल्या ग्रामस्थांची संख्या 33 म्हणजेच 33 टक्के इतकी दिसून येते. त्यामध्ये 15 टक्के पुरूष तर 18 टक्के स्त्रिया दिसून येतात.

**ग्रामस्थ ग्राम सभेस न जाण्याची कारणे –**

ग्रामसभेस जाने प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. असे असले तरी प्रत्यक्ष ग्रामसभेस जाणा–या लोकांची संख्या भरपूरच कमी दिसून येते. ग्रामस्थ ग्रामसभेस न जाण्याची कारणे कोणती आहेत याची माहिती पुढील प्रमाणे आहे...

**कोष्टक कमांक 6 ग्रामसभेस न जाण्याची कारणे**

| अ.क. | कारणे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | घरातील शेतीवाडीची कामे | 23 | 23 |
| 2) | ग्राम सभेबद्दल माहिती नाही. स्थलांतरीत तरूण वर्ग | 31 | 31 |
| 3) | ग्राम सभेचे महत्व माहीत नाही | 16 | 16 |
| 4) | आम्ही येवून काय करणार ही भावना | 17 | 17 |
| 5) | घरातून एक व्यक्ती पुरेशी आहे | 13 | 13 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकचा विचार करता ग्रामस्थ ग्रामसभेस न जाण्याची कारणे अनेक आहेत. घरातील शेतीवाडीच्या कामामुळे ग्रामसभेला न जाणाऱ्यांची संख्या 23 इतकी दिसून येते. ग्रामसभेबद्दल माहिती नसल्याने तसेच स्थलांतरितांची संख्या अधिक असल्याने ग्रामसभेला न जाणाऱ्यांची संख्या 31 इतकी दिसून येते. ग्रामसभेचे महत्वच माहित नाही म्हणून ग्रामसभेस न जाणाऱ्यांची संख्या 16 इतकी दिसून येते. आम्ही ग्रामसभेस जावून काय करणार म्हणजेच आमचे ग्रामसभेत कायम काम आहे? असे म्हणून ग्रामसभेस न जाणाऱ्यांची संख्या 17 इतकी दिसून येते. तर काहींचे असे मत आहे की, घरातून एक व्यक्ती ग्रामसभेस गेली म्हणजे झाले असे म्हणणाऱ्यांची संख्या 13 इतकी दिसून येते.

**मुख्य ग्राम सभेपूर्वी महिला सभा होते काय ? –**

नियमित ग्रामसभेपूर्वी म्हणजेच त्या सभेच्या आदल्या दिवशी महिलांचो ग्रामसभा घेण्यात यावी असे म्हटले आहे. अशा ग्रामसभा सर्व ठिकाणी होतात का? याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**कोष्टक कमांक 7 ग्रामसभेतील महिलांचा सहभाग**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | 22 | 44 |
| 2) | नाही | 05 | 10 |
| 3) | माहित नाही | 23 | 46 |
| | एकूण | 50 | 100 |

वरील कोष्टकाचा विचार करता नियमित ग्रामसभेपूर्वी होणाऱ्या महिला ग्रामसभेला जाणाऱ्या महिलांची संख्या 22 म्हणजेच 44 टक्के इतकी कमी दिसून येते. 05 महिला या सभेला जात नाहीत असे दिसून येते. तर 23 महिलांना म्हणजेच 46 टक्के महिलांना या प्रश्नाचे उत्तर देता आलेले नाही.

**ग्रासभेस आपणास आपले मत मांडू दिले जाते काय? –**

गावाच्या विकासाचे खऱ्या अर्थाने ग्रामसभा हे एक साधन व्हावे यासाठी गावातील सर्व लोकांचा या प्रकियेमध्ये प्रत्यक्ष सहभाग कायद्याने होऊ घातलेला आहे. याचाच अर्थ सर्व सदस्यांना ग्रामसभेमध्ये समान अधिकार दिलेले आहेत. परंतु हे अधिकार ग्रामस्थ उपयोगात आणतात की नाही किंवा त्यांना त्यांचे हे अधिकार वापरण्यास कोणते अडथळे आहेत का याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**कोष्टक कमांक 8 ग्रामस्थांना ग्रामसभेत आपले मत मांडू दिले जाते का ?**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | 71 | 71 |
| 2) | नाही | – | – |
| 3) | मत विचारात घेतले जाते असे वाटत नाही | 29 | 29 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकाचा विचार करता 71 ग्रामस्थांना म्हणजेच 71 टक्के ग्रामस्थांना आपले मत ग्रामसभेत पूर्णपणे मांडता येते असे दिसून येते. ग्रामसभेत मत मांडण्यास अडचण जाणवते असे म्हणणारे ग्रामस्थ मात्र दिसून येत नाहीत. मात्र 29 टक्के ग्रामस्थांना आपण मांडलेले मत विचारात घेतले जाते असे वाटत नाही.

**विविध योजना व विविध विभागाची परिपत्रके यांची माहिती दिली जाते का?**

ग्रामसभेमध्ये नवीन येणाऱ्या योजना किंवा ग्रामस्थांना उपयुक्त माहितीचे वाचन किंवा ती बाब समजावून सांगण्याची संबंधित व्यक्तीची ती जबाबदारी असते. अशा प्रकारच्या योजना लोकांपर्यंत ग्रामसभेतून पोहचविल्या जातात का? याची माहिती पुढील प्रमाणे आहे...

**कोष्टक कमांक 9 ग्रामसभांमधून विविध योजनांची माहिती मिळणेबाबत**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | 24 | 24 |
| 2) | नाही (सरकारी व निमसरकारी नोकरवर्ग गैरहजर असतो) | 45 | 45 |
| 3) | योग्य पध्दतीने दिली जात नाही | 31 | 31 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकाचा विचार करता ग्रामसभेतून आपणास विविध योजनांची माहिती दिली जाते असे म्हणणारे 24 ग्रामस्थ म्हणजेच 24 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. या विविध योजनांची माहिती ग्रामसभेमध्ये दिली जात नाही कारण सरकारी व निमसरकारी नोकरवर्ग गैरहजर असतो असे म्हणणारे 45 ग्रामस्थ म्हणजेच 45 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. तर विविध योजनांची माहिती योग्य पध्दतीने दिली जात नाही असे म्हणणारे 31 ग्रामस्थ म्हणजेच 31 टक्के ग्रामस्थ दिसून येतात.

**ग्रामसभा विकास आराखडा ग्रामसभेत तयार होतो काय ?**

गावचा विकास आराखडा ग्रामसभेत तयार व्हावा व त्याला ग्रामसभेने मंजूरी दिली पाहिजे असा कायदा जरी असला तरी प्रत्यक्षात मात्र प्रत्येक गावातील ग्रामसभा त्याला मंजूरी देते काय याची माहिती पुढील प्रमाणे आहे...

**कोष्टक कमांक 10 ग्रामसभेतील विकास आराखडा मंजूरोबाबत माहिती**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | 13 | 13 |
| 2) | नाही | – | – |
| 3) | माहित नाही | 87 | 87 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकानुसार गावचा विकास आराखडा ग्रामसभेपुढे मंजूर केला जातो असे म्हणणारे 13 ग्रामस्थ म्हणजेच 13 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. गावचा विकास आराखडा ग्रामसभेत मंजूर केला जात नाही असे म्हणणारे ग्रामस्थ दिसून येत नाही. परंतु ग्रामसभेत विकास आराखडा मंजूर केला जातो का हे माहित नसणाऱ्यांची संख्या 87 म्हणजेच 87 टक्के इतके ग्रामस्थ दिसून येतात.

**ऑडीट ग्रामसभेमध्ये मंजूरीला ठेवले जाते का? –**

ग्रामपंचातयतीच्या कोणत्याही योजनेवरील खर्चास ग्रामसभेने मान्यता दिल्याशिवाय ग्रामपंचायत कोणताही खर्च करू शकत नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीचे होणारे ऑडीट ग्रामसभेपुढे ठेवणे गरजेचे आहे. किंबहुना ऑडीटमध्ये एकदा चुकीचा मुद्दा पुढे आला असेल तर तो मुद्दा कसा दुरूस्त कला गेला याचीही माहिती ग्रामसभेपुढे ठेवणे गरजेचे आहे. या संदर्भात मंडणगड तालुक्यात काय परिस्थिती आहे याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**कोष्टक कमांक 11 ग्रामसभेमधील ऑडीट मंजूरी बाबत**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | 11 | 11 |
| 2) | नाही | 22 | 22 |
| 3) | माहित नाही | 67 | 67 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकानुसार ऑडीट ग्रामसभेपुढे मांडले जाते असे म्हणणारे फक्त 11 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. ऑडीट ग्रामसभेपुढे मंजुरीसाठी ठेवले जात नाही असे म्हणणारे 22 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. तर 67 टक्के ग्रामस्थ हे अशा प्रकारची प्रकिया ग्रामसभेत पार पडली जाते हेच आम्हाला माहित नाही असे म्हणतात.

**ग्रामसभेतील विकास कामाच्या खर्चाच्या मंजूरीबाबत –**

ग्रामसभा ही ग्रामपंचायतीची सर्वोच्च संस्था असल्याने ग्रामसभेच्या मंजूरी शिवाय तिला कोणतेही कार्य करता येत नाही. या संदर्भात मंडणगड तालुक्यात काय परिस्थिती आहे याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**कोष्टक कमांक 12 ग्रामसभेतील विकास कामाच्या खर्चाच्या मंजूरीबाबत**

| अ.क. | घटक | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1) | होय | 13 | 13 |
| 1) होय – – | 1) होय – – | 1) होय – – | 1) होय – – |
| 3) | माहित नाही | 60 | 60 |
| | एकूण | 100 | 100 |

वरील कोष्टकानुसार गावातील विकास कामाच्या खर्चाला ग्रामसभेमध्ये मान्यता घेतली जाते असे म्हणणारे 13 ग्रामस्थ म्हणजेच 13 टक्के ग्रामस्थ दिसून येतात. गावातील विकास कामाच्या खर्चाला ग्रामसभेमध्ये मान्यता घेतली जात नाही असे म्हणणारे ग्रामस्थ 27 म्हणजेच 27 टक्के इतके दिसून यतात. याबाबत आपणास काहीच माहिती नाही असे असे म्हणणारे 60 ग्रामस्थ म्हणजेच 60 टक्के ग्रामस्थ दिसून येतात.

**संशोधनाचे निष्कर्ष व उपाययोजना**

1) ग्रामसभेबाबत लोकांना त्याचे महत्व अजूनही समजलेले दिसून येत नाही. हया कायदयाने आपणास काय अधिकार दिले आहेत याचीहो माहिती जनतेला नाही. गावचा विकास हा आता जनतेच्या म्हणजेच आपल्या हाती आहे याची जाणीव अजूनही जनतेला नाही. त्यामुळेच ग्राम सभेला जाणाऱ्यांची संख्या अतिशय कमी दिसून येते. त्यातही तरूण वर्ग हा नोकरीनिमित्ताने स्थलांतरीत झालेला दिसून येतो. त्यामुळे गावाच्या विकासाचा निर्णय घेणारी शक्तीच गावात नाही त्यामुळे नेत्यांचे व सरकारी यंत्रणेचे फावलेले दिसून येते. त्यांच्यावर कोणाचा अंकुशही दिसून येत नाही.

   यासाठी गावातील स्थलांतरीत होणारी तरूण पिढी गावात थांबविली पाहिजे त्यासाठी गावातच रोजागार निर्माण झाला पाहिजे. जनतेला ग्रामसभेचे महत्व पटवून दिले पाहिजे. हे खऱ्या अर्थाने राजकीय पक्षांनी करणे अपेक्षित आहे. परंतु गावातील समजदार मंडळींनी एकत्र येवून लोकांना ग्रामसीीची माहिती दिली पाहिजे. गावचा विकास आपल्या हाती आहे याची जाणीव जनतेला करून देणे गरजेचे आहे.

2) ग्रामसभेतील महिलांचा सहभाग सुध्दा फारच कमी दिसून येतो. या पाठीमागे अनेक कारणे सांगता येतील पुरूष सत्तका, लाजाळूपणा, शेती व घराची जबाबदारी व ग्रामसभेचे महत्व अजूनही त्यांना पटलेले दिसून येत नाही. मात्र ग्रामसभेमध्ये सर्वांना आपली मते मांडू दिली जातात. परंतु याचा उपयोग हा तेव्हाच होवू शकतो जेव्हा हया महिला ग्रामसभा जाणून घेतील. ग्रामसभेला सरकारी व निमसरकारी अधिकारी/नोकर हजर नसतात. त्यामुळे त्या त्या विभागाच्या योजना किंवा नोटीस याची माहिती जनतेला मिळत नाही. तसेच त्यांचेवर जनतेचा अंकुश राहत नाही म्हणूनच ते ग्रामसभेला उपस्थित राहत नाहीत. त्यांच्या कामाचे मूल्यमापन सुध्दा ग्राम सभेमध्ये होत नाही.

   महिलांमध्ये ग्रामसभेचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. सर्व कर्मचाऱ्यांना ग्रामसभेला उपस्थित राहण्यास भाग पाडणे गरजेचे आहे. त्यांनी जनतेच्या हिताच्या योजना, सूचना व माहिती ग्रामसभेमध्ये दणे गरजेचे आहे. त्यांच्या कामाचे मूल्यमापन ग्रामसभेने करणे गरजेचे आहे.

3) विकास कामांना मंजूरी, गावचा विकास आराखडा तयार करणे व मंजूर करणे व ऑडीटला मंजूरी घेणे ही सर्व कामे खऱ्या अर्थाने सर्व जनतेला माहित असणे गरजेचे आहे. परंतु दुर्दैवाने या संदभात बहुतांश जनतेला माहिती नसल्याने संबंधित हितचिंतक याची जास्त चर्चा न करता त्याला मंजूरी घेतात.

यासाठी जनतेला या संदर्भात माहिती देणे गरजेचे आहे किंबहुना सर्व लोकांची यासंदर्भात एक कार्यशाळा घेणे गरजेचे आहे. आदर्श गावाला भेट देऊन आणणे गरजेचे आहे. अभिरूप ग्रामसभेचे आयोजन करणे गरजेचे आहे.